1 JUN 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापुरात मंगळवारी डॉ. बी. एम. हिर्डेकर यांच्या 'पाषाणपालवी' या आत्मकथनपर पुस्तकाचे प्रकाशन हॉटेल कर्मचारी मंगल व्हरांबळे आणि दामोदर पटवर्धन यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डावीकडून अमेय जोशी, सुनीलकुमार लवटे, अभयकुमार साळुंखे, डी. टी. शिर्के, सागर देशपांडे, रत्नमाला हिर्डेकर, अरुण शिंदे उपस्थित होते.

# 'पाषाणपालवी' नव्या पिढीला प्रेरणादायी

## जी. पी. माळी : बी. एम. हिर्डेकर यांच्या आत्मकथनाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** संवेदनशील, नीतिमूल्यांशी तडजोड न करणाऱ्या व्यक्तिमत्वाचे 'पाषाणपालवी' हे आत्मकथन आहे. त्यातून डॉ. बी. एम. हिर्डेकर यांच्या आयुष्यातील प्रांजळपणाचे दर्शन घडते. हे आत्मकथन नव्या पिढीला प्रेरणादायी ठरणारे आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. जी. पी. माळी यांनी येथे मंगळवारी केले.

शिवाजी विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक डॉ. हिर्डेकर यांच्या 'पाषाणपालवी' आत्मकथनपर पुस्तकाच्या प्रकाशनावेळी ते बोलत होते. विवेकानंद महाविद्यालयातील डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवनातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अभयकुमार साळुंखे, लेखक डॉ. सागर देशपांडे प्रमुख उपस्थित होते.

### हॉटेल कर्मचाऱ्यांचे हस्ते प्रकाशन

डॉ. हिर्डेकर यांनी हॉटेलमध्ये काम करून आपले शिक्षण पूर्ण केले होते. त्यामुळे त्यांना आत्मकथनाच्या प्रकाशनाचा मान हॉटेल कर्मचारी मंगल व्हरांबळे आणि दामोदर पटवर्धन यांना दिला.

'पाषाणपालवी'तील भाषा ही नव्या पिढीची आहे. ते आत्मकथन प्रत्येकाने वाचावे, असे आवाहन डॉ. माळी यांनी केले. डॉ. देशपांडे म्हणाले, तत्त्वांशी ठाम रहायचे. कोणत्याही परिस्थिती खरे बोलणे सोडायचे नाही. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी निर्भिडपणे मांडणी केली. ते सर्व या आत्मकथनात जाणविते. डॉ. हिर्डेकर म्हणाले, आईने दिलेली प्रेरणा आणि पाठबळामुळे आयुष्य घडले. नेहमी शिकत आणि प्रामाणिकपणे कार्यरत राहिल्यास आयुष्यात निश्चितपणे यश मिळते. सध्या नैराश्यात असलेल्या तरुणाईला प्रेरणा मिळावी यासाठी 'पाषाणपालवी'चे लेखन केले आहे. या कार्यक्रमास रत्नमाला हिर्डेकर, जावेद इनामदार, अक्षर दालनचे प्रकाशक अमेय जोशी, आदी उपस्थित होते. प्रा. अरुण शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. मनीषा नाईकवडी यांनी सूत्रसंचालन केले. विद्या नलवडे यांनी आभार मानले.

पुढारी

# विद्यापीठातर्फे जागतिक पर्यावरण दिन साजरा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ पर्यावरणशास्त्र विभागामध्ये जागतिक पर्यावरण दिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यानिमित्ताने गेल्या आठ दिवसांपासून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यात वादविवाद, प्रश्नमंजुषा, फोटोग्राफर, रांगोळी आणि टाकाऊपासून टिकाऊ अशा वेगवेगळ्या स्पर्धा घेण्यात आल्या.

पर्यावरणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि सामाजिक वनीकरण विभाग, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने सेंट्रल बसस्थानक येथे स्वच्छता अभियान घेण्यात आले. तसेच, एकल प्लास्टिक वापराबाबत जनजागृतीसाठी प्रभातफेरी काढण्यात आली. यावेळी डॉ. आसावरी जाधव, विभागातील शिक्षक, संशोधक, विद्यार्थी उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठ एम.एस्सी. प्रवेश परीक्षेला ५ हजार विद्यार्थी उपस्थित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेशासाठी पदव्युत्तर प्रवेश परीक्षांना प्रारंभ झाला आहे. एम.एस्सी.च्या काही अभ्यासक्रमांच्या शुक्रवारी परीक्षा झाल्या. ५६०० पैकी ५३८१ विद्यार्थ्यांनी ही प्रवेश परीक्षा दिली. विद्यार्थी उपस्थितीचे प्रमाण ९६.१५ टक्के आहे.

विद्यापीठातीलविविधअधिविभाग तसेच संलग्नित महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेशासाठी पदव्युत्तर प्रवेश परीक्षेचे आयोजन १०, ११ १२ व १३ जून रोजी कोल्हापूर,




सांगली, सातारा, सोलापूर व बेळगाव जिल्ह्यातील १६ परीक्षा केंद्रांवर केले आहे. शुक्रवारी (दि.१०) एम.एस्सी. - केमिस्ट्री, मायक्रोबायोलॉजी, मॅथेमेटिक्स, फिजिक्स, झुलॉजी या अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

11 JUN 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



## ढगांचा मनोहारी आविष्कार...

कोल्हापूर : मान्सून आज दाखल होईल उद्या होईल, असा अंदाज वर्तवला जात असला तरी शुक्रवारी दुपारनंतर शहरातील काही ठिकाणी पावसाने तुरळक हजेरी लावली. तत्पूर्वी शिवाजी विद्यापीठ परिसरात ढगांचा मनोहारी आविष्कार अनुभवायला मिळाला.

(नितीन जाधव : सकाळ छायाचित्रसेवा)

तरुण भारत

# कन्या महाविद्यालयात बापूजी साळुंखे जयंती

**इचलकरंजी :** स्वामी विवेकानंदांचा विश्वबंधुत्वाचा विचार डॉ. बापूजी साळुंखे यांनी समाजापर्यंत शिक्षणाच्या माध्यमातून पोहचविला, असे मत शिवाजी विद्यापीठातील मराठी अभ्यास मंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. डी. ए. देसाई यांनी व्यक्त केले. येथील श्रीमती आ. रा. पाटील कन्या महाविद्यालयात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. डॉ. देसाई म्हणाले, डॉ बापूजी साळुंखे यांनी खडतर तपश्चर्येतून श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची उभारणी केली. महर्षी धोंडो केशव कर्वे, म. फुले, सावित्रीबाई फुले, म. गांधीजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा घेऊन विविध संस्कार केंद्रांची स्थापना केली. सूत्रसंचालन डॉ. संपदा टिपकुर्ले यांनी केले. प्रास्ताविक डॉ. धीरज शिंदे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. सुभाष जाधव यांनी केला. आभार प्रा. संदीप पाटील यांनी मानले.